-६५

**शासकीय पड / गायरान जमिनीकरीता शेतीसाठी झालेली अतिक्रमणे नियमानुकूल करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : एलईएनएल १०/२००४/प्र.क्र.४९/ज-१
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ९ मार्च, २००७.

वाचावे:- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एलईएन १०९०/प्र.क्र.१७२/ज-१, दि.२८.११.१९९१.

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एलईएन १०९२/प्र.क्र.६५/ज-१, दि.२२.४.१९९२.

३) शासन पत्र, महसूल व वन विभाग क्रमांक एलईएन १०९२/प्र.क्र.६५/ज-१, दि.१६.१२.१९९८.

४) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्रमांक एलईएन १०९८/१५/प्र.क्र.४६/ ज-१, दि.२३.३.१९९९.

५) शासन परिपत्रक , महसूल व वन विभाग क्रमांक एलईएन १०/२००१/प्र.क्र.२२२/ ज-१, दि. १४.८.२००१.

६) शासन अर्ध शासकीय पत्र समक्रमांक दि.४.१२.२००४.

**शासन परिपत्रक :-**

शासकीय पड / गायरान जमिनीवरील दि.१.४.१९७८ ते दि.१४.४.१९९० या कालावधीत शेतीसाठी झालेली व दि.१४.४.१९९० रोजी अस्तित्वात असलेली अतिक्रमणे शासन निर्णय दि.२८.११.१९९१ व शासन परिपत्रक दि.२२.४.१९९२ मधील अटी व शर्ती पूर्ण करीत असलेल्या अतिक्रमणदारांची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याच्या सुचना दि.१६.१२.१९९८ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत. तसेच शासन परिपत्रक दि.२३.३.१९९९ अन्वये शासकीय पड / गायरान जमिनीवरील शेतीची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची कार्यवाही तातडीने करण्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्याना कळविण्यात आलेले होते. तथापि प्रत्येक जिल्ह्यात उपरोक्त कालावधीमधील नियमानुकूल करण्याबाबतची बरीच प्रकरणे अद्यापि प्रलंबित असल्याचे लोकप्रतिनिधींनी शासनाच्या निदर्शनास आणले आहे. तसेच राज्यातील भटके व विमुक्त जाती अभ्यास व संशोधन समितीनेही या प्रकरणी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत सूचना द्याव्यात, अशी शिफारस केली आहे.

२. संदर्भाधीन शासन निर्णय क्र.१ प्रमाणे शेतीची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची कार्यवाही विहीत मुदतीत पूर्ण करणे आवश्यक होते. तथापि प्रदीर्घ कालावधी लोटूनही याबाबतच्या प्रकरणांत अद्यापि निर्णय घेण्यात आलेला नाही. क्षेत्रिय स्तरावर याबाबत संनियंत्रण (कृ.मा.प.

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
शाखा - ८/३
आवक नं. ११६१
5 MAY 2007
विशेष नोंद वही नं.
कार्यविवरण नं.
प्र. लि. सि.उ.जि. जिल्हाधिकारी